# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

**E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७**

**Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३**


**महत्वाचे/तात्काळ** क्रमांक :-विकाअ/शिक्षण/NEFT/२०१५/3027

दिनांक - 5 DEC 2015

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- एनईएफटीव्दारे रक्कम अदा करण्याबाबत.**
**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक ६/लेखाशाखा/पीएलए/२०१५/२७८ दिनांक ०४/११/२०१५.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार या विभागांतर्गत येणा-या सर्व संस्थांना मा. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचेकडून निर्गमीत करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशानुसार वेळोवेळी एनईएफटी व्दारे रक्कम अदा करण्यात येते. (उदाहरणार्थ इ.बी.सी. अनुदान, ए.आर.सीचे मानधन इत्यादी) करीता आपणाकडून डिसेम्बर २०१४ पासून शासन निर्णय दिनांक १८ एप्रिल २०११ मधील तरतूदीनुसार बँक तपशिल घेण्यात आलेला आहे. तथापि यापुर्वी आपणाकडून सादर केलेल्या बँक खाते तपशिलाच्या अनुषंगाने आपणास एनईएफटीव्दारे रक्कम अदा करण्यात आलेल्या आहेत. परंतू आपणाकडून सादर करण्यात आलेल्या बँक तपशिल मध्ये नमूद बँक खाते क्रमांक हा संस्थेचा नसून एखाद्या कर्मचा-याचे / अधिका-याचे / मॅनेजमेन्ट वरील एखाद्या सदस्याचे देखील देण्यात आल्याचे दिसून येते, सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेचे प्राचार्य या पदनामाने काढलेले बँकेचा तपशिल **जोडपत्र-अ** मध्ये पुर्णतः भरुन व सोबत **पासबूकची साक्षांकीत छायांकीत प्रत** या कार्यालयास **दिनांक ११/१२/२०१५ पर्यंत** या कार्यालयास सादर करावी**,**

**सहपत्र :- जोडपत्र-अ**

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०१०/ प्र क्र ६८/ कोषा प्र-५, दिनांक १८ एप्रिल, २०११ चे सहपत्र

जोडपत्र-अ

ईसीएस/ एनईएफटी/द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१. संस्थेचे नाव व डीटीई कोड

२. कार्यालयाचे नाव व पत्ता

३. बँक खाते क्रमांक

४. बँक खात्याचा प्रकार

५. बँकेचे नाव

६. बँक शाखेचे नाव व पत्ता

७. बँक शाखेचा संकेतांक

८. एमआयसीआर क्रमांक

९. आयएफएससी संकेतांक

दिनांक : संस्थाप्रमुखांची सही

बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे.

बँक शाखा प्रमुख

........ (बँक शाखेचे नाव व शिक्का )

D:\Budage\2015-16\General Correspondence\IFSC code of institutes.docx